डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २९७ /२०२५ दि. २९ /१२/२०२५

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता उमेदवार अर्ज भरणे करण्यासाठी दि. ३०/१२/२०२५ रोजी 'जी' प्रभाग क्षेत्र कार्यालय, डोंबिवली पुर्व येथे मोठया प्रमाणावर विविध पक्ष/अपक्ष उमेदवार त्यांचे कार्यकर्ते/समर्थकांसह हजर राहणार आहेत. निवडणुक आदर्श संहितेचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी अर्ज भरणी केंद्रापासुन विहित अंतराच्या आत वाहने/नागरिकांच्या प्रवेशास मनाई आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद– १) सुनिलनगर क्रॉस रोड येथुन हॉलावे रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सर्वोदय सृष्टी बिल्डीग समोरील रोड जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग– सदरची सर्व वाहने सुनिलनगर रोडने इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद– २) सुनिलनगर रोड क्रॉस येथुन हॉलोवे रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बहिणाबाई चौधरी उदयान** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग– सदरची वाहने सुनिलनगर रोडने इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दि. ३०/१२/२०२५ रोजी सकाळी ०९:०० वा. पासुनन ते सायंकाळी १६:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर